निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
१६ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२२ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## बोगस मतदानाचा सूळसुळाट?

# मालेगावात आढळले एकाच ठिकाणी २०० पेक्षा जास्त मतदान कार्ड

आत्ताच एक्सप्रेस

**मालेगावात/ प्रतिनिधी/** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज (१५ जानेवारी) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. अशातच महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मालेगावात एकाच ठिकाणी २०० पेक्षा जास्त मतदान कार्ड सापडल्याची घटना घडलीय. इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान कार्ड सापडून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शिवाय हे मतदान कार्ड बोगस असल्याचा संशय देखील बळावला आहे.



मिळलेल्या माहितीनुसार, मतदान केंद्राला लागूनच एका घरात हे मतदान कार्ड सापडले आहे. दरम्यान, मतदान कार्डवर संशय आल्यावर प्रशासनाकडून कारवाई सुरू करण्यात आली असून याबाबत अधिक तपास सुरु करण्यात आला आहे. कार्ड जप्त करून पंचनामा सुरू करण्यात आला असून या कार्ड संदर्भात निवडणूक अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. तर या मतदार कार्डचा उमेदवाराकडून जागेवरच पंचनामा करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मालेगावातील 'बडी हायस्कूल' येथे दोन प्रभागातील ४० मतदान केंद्र, मतदारांची धावपळ

दुसरीकडे, मालेगाव महापालिकेसाठी आज मतदान होत आहे. मालेगाव पूर्व भागातील बडी हायस्कूल येथे प्रभाग क्रमांक १५ व १७ मधील तब्बल ३० ते ४० मतदान केंद्र आहेत. त्यामुळे मतदारांना केंद्र शोधण्यास अडचण निर्माण होत आहे. यावर मार्ग म्हणून शहरातील काही तरुणांनी आपल्या हाताने या मतदान केंद्राचा नकाशा तयार करत येणाऱ्या प्रत्येक मतदाराची मदत करत त्यांना मतदान केंद्र शोधून देत आहे.

**मंत्री दादा भुसे यांनी बजावला कुटुंबासह मतदानाचा हक्क :** मालेगाव महापालिका निवडणुकीसाठी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज मालेगावच्या सोयगाव भागातील शुभदा विद्यालयातील मतदान केंद्रावर आपल्या कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावला. यावेळी मंत्री भुसे यांच्या पत्नी दोन्ही मुले, सुना आदींनी सोबतच मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत जनतेने भरभरून प्रतिसाद दिला. ही निवडणूक जनतेनेच हाती घेतली होती. मतदारांकडून मिळालेल्या भरभरून प्रतिसादाच्या जोरावर आपला विजयी निश्चित होणार असल्याचा विश्वास देखील दादा भुसे यांनी व्यक्त करतांनाच मंत्री भुसे यांनी मतदार राजाला भरभरून मतदान करण्याचे आवाहन केले.

### मतदारयादीत घोळ असल्याने मतदानाची टक्केवारी कमी

मालेगाव महानगरपालिका निवडणूक मतदार यादीत मोठा घोळ असल्याने मतदानाची टक्केवारी कमी होत आहे. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. मात्र मालेगावकर जनतेने मतदानाची टक्केवारी वाढवावी असे आवाहन इस्लाम पार्टीचे माजी आमदार आसिफ शेख यांनी केले. मालेगाव महापालिका निवडणुकीसाठी इस्लाम पार्टीने समाजवादी पार्टीसोबत युती करत 'मालेगाव सेक्युलर फ्रंट' नावाने निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत मालेगाव सेक्युलर फ्रंटला नक्कीच बहुमत मिळेल आणि जर आमच्या अटी शर्ती जातीवादी पक्षसोडून इतर पक्षाला मान्य असतील तर त्यांना आमच्या सोबत घेऊ , अशी प्रतिक्रिया माजी आमदार आसिफ शेख यांनी दिली.

## संक्षिप्त

### मध्य रेल्वेवर महिनाभर मोठा ब्लॉक, लोकलसह एक्सप्रेस विलंबाने; पनवेल, कर्जत, कल्याण... कुठे होणार परिणाम?

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई/ प्रतिनिधी/** डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर अर्थात, समर्पित माल वाहतूकमार्ग प्रकल्पाच्या मार्गात पनवेल ते कळंबोलीदरम्यान ओपन वेब गर्डरची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी मध्य रेल्वेने रविवार १८ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान पनवेल ते कळंबोलीदरम्यान अप आणि डाउन मार्गावर विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घोषित केला आहे.

डीएफसीसी प्रकल्पातील ओपन वेब गर्डर ११० मीटर लांबीचा आहे. त्याचे वजन १,५०० मेट्रिक टन असणार आहे. मध्यरात्रीच्या ब्लॉकमध्ये टप्याटप्याने गर्डर उभारणी पूर्ण करण्यात येणार आहे. ब्लॉक वेळेत १६ मेल-एक्स्प्रेसवर परिणाम होणार असून काही मेल-एक्स्प्रेस विलंबाने धावणार आहेत.

**जानेवारीमध्ये कोणत्या गाड्यांवर परिणाम? :** १८-१९ जानेवारी, २०२६ रोजी (रविवार/सोमवारची रात्र) मध्यरात्री ०१:२० - ०३:२०च्या दरम्यान गाडी क्रमांक २२१९३ दौंड-ग्वाल्हेर एक्सप्रेस कर्जत-कल्याण-वसई रोड मार्गे वळवण्यात येईल. तसेच, गाडी क्रमांक १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस पनवेल येथे ०३:१४ ते ०३:२० दरम्यान थांबवण्यात येईल.

२५-२६ जानेवारी, २०२६ रोजी (रविवार/सोमवारची रात्र) ०१:२० - ०५:२० दरम्यान, गाडी क्रमांक २२१९३ दौंड-ग्वाल्हेर एक्सप्रेस कर्जत-कल्याण-वसई रोड मार्गे वळवण्यात येईल. त्याचबरोबर, गाडी क्रमांक १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस सोमटाणे येथे (०२:५८-०५:२०) थांबवण्यात येईल.

शिवाय गाडी क्रमांक २०११२ मडगाव-सीएसएमटी कोकण कन्या एक्सप्रेस पनवेल येथे (०४:०२-०५:२०) थांबवण्यात येईल. ट्रेन ११०४ सावंतवाडी रोड-दादर तुतारी एक्सप्रेस आपटा येथे थांबवण्यात आली (०४:२५-०५:१५ वाजता). ट्रेन १२६२० मंगळूर-एलटीटी मुंबई मत्स्यगंधा एक्सप्रेस जिते येथे थांबवण्यात आली (०४:४१-०५:१० वाजता). ट्रेन १०१०३ सीएसएमटी-मडगाव मांडवी एक्सप्रेस सीएसएमटीहून ०८:२० वाजता सुटण्यासाठी पुनर्निर्धारित करण्यात आली आहे. ट्रेन १७३१७ हुबळी-दादर एक्सप्रेस १५-२० मिनिटे उशिरा पोहोचण्याची शक्यता आहे.

**फेब्रुवारीमध्ये सेवांवर परिणाम :** ३-४ फेब्रुवारी, २०२६ रोजी (मंगळवार/बुधवार रात्र) मध्यरात्री ०१:२० - ०४:२० वाजता ट्रेन १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस सोमटाणे येथे थांबवण्यात येणार असून (०२:५८-०४:१० वाजता) ट्रेन २०११२ मडगाव-सीएसएमटी कोकण कन्या एक्सप्रेस पनवेल येथे थांबवण्यात येईल (०४:०२-०४:२० वाजता), तसेच १०-११ फेब्रुवारी, २०२६ (मंगळवार/बुधवार रात्री).

# महिला उमेदवाराच्या पतीवर जीवघेणा हल्ला, तपासात धक्कादायक माहिती समोर

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड/ प्रतिनिधी/** निवडणुकीच्या प्रचारादरम्यान विरोधात भाषण केल्यामुळे काँग्रेस महिला उमेदवार सारिका भालेराव यांच्या पतीवर दुचाकीवर आलेल्या सहा अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. सुदैवाने या हल्ल्यात महिला उमेदवाराचे पती बचावले आहेत. प्रभाग क्रमांक एकमध्ये हा थरार मंगळवारी १३ जानेवारी रात्री उशिरा घडला होता. शिवाजी भालेराव, असं महिला उमेदवाराच्या पतीचं नाव आहे. झालेला हा हल्ला हा राजकीय नसून दरोडा असल्याचं आता समोर आलं आहे.



### 'पती हे पैसे वाटत आहे'

याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यावरुन नांदेड हद्यीतील बेलानगर तरोडा बु. येथे आरोपी असल्याचं समजलं. अरूणोदय नगर नांदेड येथील विहाराजवळ सापळा रचून संशयित आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यांनी व त्यांचे इतर साथीदार यांनी मिळून महिला उमेदवाराचे 'पती हे पैसे वाटत आहे', असं समजून त्यांच्याशेजारी ठेवलेली बॅग चोरून नेल्याची कबुली दिली.

**संशयितांना अटक :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयितांना अटक केली आहे. रितेश दिपक पंडित (वय २२), शुभम संजय नरवाडे (वय १९), संघर्ष महेंद्र वगर (वय १९), चांदेश ऊर्फ ओमकार कोंडीबा जाधव (वय १८) आणि वैभव गोपाळ थोरात (वय १९) असं अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावं असून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा यात समावेश आहे. हे सर्व नांदेड शहरातील रहिवासी आहेत.

**'निवडणुकीत विरोधात भाषण का केलं'?** प्रभाग क्रमांक एकमधून काँग्रेसने शिवाजी भालेराव यांच्या पत्नी सारिका भालेराव यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. मंगळवारी १३ जानेवारी सायंकाळी प्रचार संपल्यानंतर उमेदवाराचे पती शिवाजी भालेराव हे आपल्या मित्रासोबत थांबले होते. याचदरम्यान दुचाकीवर आलेल्या काही अज्ञात हल्लेखोरांनी तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, सुदैवाने तलवारीचा वार चुकवल्याने ते बचावले. 'निवडणुकीत विरोधात भाषण का केलं, तुझा बियाणी करतो', अशी धमकी हल्लेखोरांनी दिली, असं काँग्रेस उमेदवाराच्या पतीने सांगितलं.

**दहा हजाराची रक्कम जप्त :** दरम्यान, आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेला एक खंजर जप्त करण्यात आला. तसेच मोटार सायकल पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे. घटनास्थळावरून चोरलेली बॅग ज्यामध्ये कपडे व रोख रक्कम दहा हजार रूपये असलेली हस्तगत केली आहे. सदरचा गुन्हा १२ तासाचे आत उघडकीस आणला असून सदरची कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.

# निवडणुकीच्या मतमोजणीप्रसंगी अडचण आली तरच 'पाडू'चा वापर

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई/ प्रतिनिधी/** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या मतदान यंत्राद्वारे झालेल्या मतदानाची मोजणी करताना काही तांत्रिक अडचण आल्यास 'पाडू' (प्रिंटींग ऑक्सिलरी डिस्प्ले युनिट) या यंत्राचा वापर करून निकाल बघण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र पाडूचा वापर सरसकट केला जाणार नाही. तांत्रिक अडचणीच्या प्रसंगी अत्यंत अपवादात्मकरित्या त्याचा वापर केला जाईल, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.



भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडची मतदान यंत्रे केवळ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीच वापरली जात आहेत. ही यंत्रे भारत निवडणूक आयोगाची असून ती 'एम३ए' या प्रकाराची आहेत. त्यात झालेल्या मतदानाची मतमोजणी कंट्रोल यूनिटला (सीयू) बॅलेट यूनिट (बीयू) जोडूनच करावी, फक्त तांत्रिक अडचण आली तरच अत्यंत अपवादात्मकरित्या पाडूचा वापर करावा, असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी १४० पाडूंची उपलब्धता करून देण्यात आली आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मतमोजणीसाठी पाडूची गरज भासल्यास कंपन्याच्या तंत्रज्ञांच्या उपस्थितीत त्याचा वापर करावा. त्याचबरोबर पाडूच्या वापराबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या यंत्राचे प्रात्यक्षिक दाखविण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रात्यक्षिक दाखविले आहे.

### महिला लोकशाही दिनाचे १९ जानेवारी रोजी आयोजन



आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई/ प्रतिनिधी/** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या वतीने महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार महिला लोकशाही दिन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे आयोजित करण्यात येणार आहे, असे मुंबई शहरच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.


या उपक्रमांतर्गत पीडित महिलांना त्यांच्या तक्रारी व अर्ज सादर करण्यासाठी जिल्हा पातळीवर सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, २१५ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई - ४०००२५ येथे तक्रार अर्जाचा नमुना उपलब्ध आहे.

तक्रार दाखल करताना अर्ज निर्धारित नमुन्यात भरावा. तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या असाव्यात. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, अपूर्ण अर्ज, धर्म व राजकारण विषयक बाबी अथवा वैयक्तिक स्वरूप नसलेल्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# जपानमधील होक्काईडो प्रांताच्या उपराज्यपालांनी घेतली कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांची भेट

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जपानमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून येत्या तीन महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. जपानच्या होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी मंत्रालयात कौशल्य विकास मंत्री लोढा यांची शिष्टमंडळासह भेट घेतली.



यावेळी कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळाची जपानमध्ये मोठी मागणी असल्याच्या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधीबाबत चर्चा करण्यात आली. कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, कौशल्य विकास विभागाचे आयुक्त डॉ. अमित सैनी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, जपानच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे वरिष्ठ संचालक तोशिनोरी नाईतो, परदेशी मनुष्यबळ विभागाचे संचालक ईजी यामामोटो तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाचे संचालक माकोतो ताकाहाशी, आंतरराष्ट्रीय व्यवसाय विनिमय विभागाच्या प्रमुख हिरोए मिकामी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान भाषांतराची जबाबदारी दुभाषी युका इगाराशी यांनी पार पाडली.

होक्काईडो हा जपानच्या उत्तरेकडील प्रांत असून, जपानचा जवळपास २२ टक्के भाग या प्रांताने व्यापला आहे. या प्रांतात कृषी, मत्स्य, उद्योग, बांधकाम आणि पायाभूत सुविधा तसेच नर्सिंग क्षेत्रात मनुष्यबळाची नितांत गरज आहे. त्यानुसार कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेसाठी होक्काईडो प्रांताने आंतरराष्ट्रीय भागीदारीसाठी पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून या प्रांताच्या शिष्टमंडळाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री लोढा यांची भेट घेतली.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जागतिक स्तरावर भारतीय मनुष्यबळ क्रियाशील ठेवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कौशल्य विकासावर अधिक भर आहे. त्यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील कौशल्य विभाग कार्यरत असून विविध देशांमध्ये राज्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने काम सुरु आहे. विद्याविहार येथील स्वामी विवेकानंद कौशल्य विकास प्रबोधनीद्वारे कौशल्य प्रशिक्षण आणि जपानी भाषेचे शिक्षण देण्याचा प्रयत्न असल्याचेही कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी सांगितले.

जपानमध्ये कृषी, वैद्यकीय, विविध तंत्रज्ञ, बांधकाम आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहे. भारतीय युवक अधिक कार्यक्षमतेने काम करत असून भारतीय कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जगभरात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी सांगितले.

# मतदान : हक्कापलीकडे जाऊन लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन

लोकशाही म्हणजे केवळ राज्यघटना, निवडणुका किंवा सत्ता बदलाची यंत्रणा नव्हे; लोकशाही म्हणजे सतत जागृत असलेली नागरिकांची जाणीव. या जाणीवेचा सर्वात प्रभावी, शांत आणि घटनात्मक आविष्कार म्हणजे मतदान. मतदानाला आपण अनेकदा माझा हक्क म्हणून संबोधतो. ते खरेही आहे. पण केवळ हक्क म्हणून मतदानाकडे पाहणे ही लोकशाहीची कक्षा मर्यादित करणारी भूमिका ठरते. वास्तवात मतदान हे केवळ हक्क नसून, लोकशाही जपण्याचे, टिकवण्याचे आणि सुधारण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. आजच्या काळात मतदानाबाबत वाढणारी उदासीनता, 'एक मताने काय फरक पडतो?' असा प्रश्न, किंवा 'सगळेच सारखे आहेत' ही मानसिकता, या साऱ्या प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहेत. कारण लोकशाही निवडणुकीत मरत नाही; ती मतदान न करण्याच्या उदासीनतेत हळूहळू कोमेजते.

भारताने स्वातंत्र्य मिळवले तेव्हा जगातील अनेक देशांत सार्वत्रिक मतदानाचा हक्क नव्हता. शिक्षण, संपत्ती, जात, लिंग यांवर आधारित मताधिकाराच्या अटी होत्या. पण भारतीय राज्यघटनेने वयाची अट सोडली तर कोणताही भेद न करता मतदानाचा अधिकार दिला. हा निर्णय म्हणजे केवळ कायदेशीर तरतूद नव्हती; तो होता समतेचा, विश्वासाचा आणि नागरिकत्वाच्या सन्मानाचा घोष. मतदान हा बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेचा गाभा होता. त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीही आवश्यक आहे. मतदानाद्वारे सामान्य माणसाला सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मिळतो. त्यामुळे मतदान म्हणजे कागदावर उमटवलेली खूण नसून, इतिहास घडवणारी कृती आहे.



हक्क आणि जबाबदारी यांत मूलभूत फरक आहे. हक्क मिळाल्यावर तो वापरणे अथवा न वापरणे हा वैयक्तिक निर्णय असू शकतो. पण मतदान ही जबाबदारी आहे, कारण त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर, पुढील पिढ्यांवर आणि राष्ट्राच्या भवितव्यावर होतो. मतदान न करणे ही तटस्थता नसून, ती अनेकदा चुकीच्या शक्तींना मोकळे रान देणारी भूमिका ठरते. मतदान न करणारा नागरिक अप्रत्यक्षपणे म्हणतो, जे होईल ते चालेल. पण लोकशाहीत 'जे होईल ते चालेल' अशी भूमिका स्वीकारली, की लोकशाही हळूहळू हुकूमशाहीकडे झुकू लागते. म्हणूनच मतदान हे केवळ अधिकाराचे नव्हे, तर जबाबदारीचे आणि नैतिक कर्तव्याचे साधन आहे.

एका मताने काय फरक पडतो? हा प्रश्न लोकशाहीबद्दलच्या गैरसमजाचे द्योतक आहे. इतिहास साक्षी आहे की अनेक निवडणुका काही मतांच्या फरकाने जिंकल्या गेल्या आहेत. पण मुद्दा केवळ आकड्यांचा नाही. एक मत म्हणजे एक आवाज, आणि लाखो आवाज मिळून जनमत तयार होते. एक मत हे निषेधाचे साधन असू शकते, समर्थनाचे साधन असू शकते, बदलाची सुरुवात असू शकते. मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यांना दिलेला पाच वर्षांचा 'ब्लँक चेक' नसून, तो असतो जबाबदारीचा परवाना काम चांगले केले तर पाठिंबा, अन्यथा नकार. लोकशाहीतील सर्वात मोठा धोका बाहेरून येत नाही; तो आतूनच निर्माण होतो, नागरिकांच्या उदासीनतेतून. जेव्हा लोक मतदानाकडे पाठ फिरवतात, तेव्हा अल्पसंख्याक मतांनी निवडलेली सत्ता बहुसंख्याकांवर राज्य करू लागते. अशा वेळी लोकशाही औपचारिक राहते, पण तिचा आत्मा मरतो. मतदान हे लोकशाहीचे संरक्षण कवच आहे. ते सत्तेला मर्यादा घालते, सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर जबाबदार ठेवते आणि संस्थांना स्वायत्त ठेवण्यास मदत करते. नियमित, मुक्त आणि निष्पक्ष मतदान हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

भारत हा तरुणांचा देश आहे. पण निवडणुकांमध्ये युवकांचा सहभाग अपेक्षेइतका दिसत नाही. सोशल मीडियावर मतप्रदर्शन करणारा तरुण अनेकदा मतदान केंद्रापर्यंत जात नाही. ही विसंगती धोकादायक आहे. कारण सोशल मीडियावरील प्रतिक्रिया क्षणिक असतात; मतदान मात्र स्थायी परिणाम घडवते.युवकांनी मतदानाकडे केवळ अधिकार म्हणून नव्हे, तर भविष्य घडवण्याचे साधन म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षण, रोजगार, पर्यावरण, सामाजिक न्याय या सगळ्या प्रश्नांची दिशा मतदानातून ठरते. मतदान न करणारा तरुण उद्याच्या समस्यांवर तक्रार करण्याचा नैतिक अधिकार गमावतो. मतदान हे केवळ राजकीय साधन नसून, ते सामाजिक समतेचे प्रभावी अस्त्र आहे. इतिहासात वंचित, दलित, आदिवासी, महिला यांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी मोठे संघर्ष करावे लागले. आज त्या हक्काचा वापर न करणे म्हणजे त्या संघर्षांचा अवमान ठरतो. मतदानामुळेच वंचित घटकांचे प्रश्न विधानसभेत, संसदेत पोहोचतात. मतदानाद्वारेच प्रतिनिधित्व बदलते, धोरणे बदलतात. त्यामुळे मतदान हे केवळ स्वतःसाठी नव्हे, तर ज्यांचा आवाज दबला आहे त्यांच्यासाठीही महत्त्वाचे आहे.

लोकशाहीत मतदान म्हणजे केवळ एखाद्या उमेदवाराला निवडणे नव्हे; तर असमाधान नोंदवण्याचाही मार्ग आहे. 'नोटा' हा पर्याय लोकशाहीतील असहमतीचा वैधानिक मार्ग आहे. सर्वच उमेदवार अयोग्य वाटत असतील, तरी मतदान केंद्रावर जाऊन आपली भूमिका नोंदवणे हे लोकशाहीला बळ देणारे कृत्य आहे. मतदान न करणे आणि 'नोटा'ला मतदान करणे यात मूलभूत फरक आहे. मतदान न करणे म्हणजे मौन; 'नोटा' म्हणजे सजग निषेध. मतदान हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित कृत्य नाही; ते लोकशाहीचा श्वास आहे. श्वास थांबला, तर शरीर जिवंत राहत नाही; तसेच मतदान थांबले, तर लोकशाही नावापुरती उरते. म्हणून मतदानाकडे केवळ माझा हक्क म्हणून पाहणे अपुरे आहे. ते आहे माझी जबाबदारी, माझे कर्तव्य आणि माझी ताकद. लोकशाही जपायची असेल, तर ती वापरावी लागते. मतदानाद्वारे सजगपणे आणि निर्भयपणे, कारण मतपेटीत टाकलेले प्रत्येक मत हे केवळ कागद नसते तर ते असते लोकशाही जिवंत ठेवणारे वचन.

– **प्रवीण बागडे**, नागपूर, मो.क्र. ९९२३६२०९१९

# इराणमधील खोमेनी यांच्या सत्तेला सुरुंग



इराणमधील खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेला नागरिकांचा उद्रेक थांबायचे नाव घेत नाही. इराणमध्ये खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून जनतेचे मोठे आंदोलन चालू असून या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ५४४ जणांचा बळी गेला असून १० हजाराहून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. हजारो आंदोलकांना अटक व ५४ आंदोलकांचा बळी जाऊनही इराणी नागरिक खोमेनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतच आहेत. खोमेनी सरकार हे आंदोलन चिरडण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे मात्र आंदोलक कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबवण्याच्या मानसिकतेत नाही. तेथील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने भारतानेही इराणमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर इराण सोडण्याचे आव्हान केले आहे. खोमेनी सरकार उलथवून टाकायचेच अशा मानसिकतेत आंदोलक असल्याने हे आंदोलन आणखी भडकण्याची शक्यता आहे. इराणमधील या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनाला अमेरिकेची फूस असल्याची चर्चा जागतिक माध्यमात आहे. चीन, रशिया या देशांनी तर तसा थेट आरोपच केला आहे. अर्थात हा आरोप चुकीचा आहे असे कोणीही म्हणणार नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून इराणवर त्यांची वक्रदृष्टी होतीच. इस्त्राईल – इराण युद्धात ही अमेरिकेने इराण विरोधात भूमिका घेतली होती. इराणमधील खोमेनी सरकार उलथवून टाकणार असे ते कायम म्हणत आले आहेत. इराणमधील खोमेनी सरकार मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असल्याने इराणवर अमेरिका हल्लाही करू शकते असा सज्जड दमही ट्रम्प यांनी इराणला दिला होता त्यामुळे इराणमधील या आंदोलनाला हवा देऊन खोमेनी यांचा परस्पर काटा काढण्याचा ट्रम्प यांचा डाव असू शकतो. व्हेनेझुएला प्रमाणे इराणमधील तेलसाठ्यावर देखील ट्रम्प यांची नजर आहे. खोमेनी अमेरिकेला ते सहजासहजी ते मिळवू देणार नाही म्हणून ते या आंदोलनाला धगधगत ठेवून खोमेनी यांचा काटा काढत आहे हे सत्य आहे. अमेरिका या आंदोलनाला पेटवत आहे हे जरी खरे असले तरी या आंदोलनाला खोमेनी हे स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. रियाल हे इराणचे चलन आहे. रियालचे गेल्या काही वर्षात प्रचंड अवमुल्यन झाले आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे १ डॉलर अशी रियालची अवस्था झाली आहे. त्यामुळे येथील नागरिक भयचित झाले आहे. रियालचे अवमुल्यन झाल्याने तेथे महागाईचा कडेलोट झाला आहे. अन्नधान्य, औषधे आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. रियालचे अवमुल्यन होऊन महागाई प्रचंड वाढली, जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे देखील आवाक्याबाहेर गेल्याने नागरिक रस्त्यावर उतरले. वास्तविक या आंदोलनाची सुरुवात मागील महिन्यातच झाली होती. नागरिक रस्त्यावर उतरत असतानाही महागाई कमी करण्यासाठी आणि रियालचे अवमुल्यन रोखण्यासाठी खोमेनी यांनी कोणतेही पावले उचलली नाही त्याचा फटका त्यांना बसला. मागील महिन्यात तेहरान या इराणच्या राजधानीत सुरू झालेले हे आंदोलन आता इराणच्या ३३ प्रांतात पसरले आहे. हे आंदोलन आणखी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे आणखी या आंदोलनात आणखी काही आंदोलनाचा जीव जाऊ शकतो. कदाचित हे आंदोलन खोमेनी यांचे सरकार उलथवूनही टाकेल. या आंदोलनाचा शेवट काय होईल हे येणारा काळच ठरवेल एकमात्र नक्की की या आंदोलनाने अनेक दशके सुरू असलेल्या खोमेनी यांच्या इराणमधील सत्तेला सुरुंग लागला आहे.

– **श्याम ठाणेदार**, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

## 'हिंद की चादर'

# धर्मस्वातंत्र्य, मानवता व सत्यासाठीची प्रेरणा देणारा ऐतिहासिक उपक्रम

धर्म, सत्य आणि मानवतेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे नववे शीख गुरु श्री गुरु तेग बहादूर सिंह जी यांचे बलिदान भारतीय इतिहासात अजरामर आहे. हिंद की चादर म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर जी हे केवळ शीख समाजाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतवर्षातील धर्मस्वातंत्र्याचे महान रक्षक होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शीख समाज, सिंधी समाज, बंजारा समाज आणि लुबाणा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने, नांदेड येथे येणाऱ्या २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी भव्य हिंद की चादर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

गुरु तेग बहादूर जी : धर्मस्वातंत्र्याचे महान रक्षक

गुरु तेग बहादूर सिंह जी (१६२१-१६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांनी जबरदस्तीने धर्मांतराच्या विरोधात उभे राहत काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांनी कोणत्याही एका धर्मासाठी नव्हे, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. दिल्लीतील चांदणी चौक येथे त्यांनी दिलेले बलिदान आजही मानवतेचा, सहिष्णुतेचा आणि धैर्याचा सर्वोच्च आदर्श मानले जाते.



शासनाची दूरदृष्टी आणि सहकार्य

हिंद की चादर हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नसून, तो समाजात ऐक्य, सहिष्णुता आणि इतिहासाबद्दलची जाणीव निर्माण करणारा व्यापक प्रयत्न आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या पुढाकाराचे विशेष कौतुक करावे लागेल. नांदेड येथे होणाऱ्या हिंद की चादर कार्यक्रमासाठी विविध समन्वय बैठकांचे आयोजन करून प्रशासन व समाज यांच्यात उत्कृष्ट समन्वय साधुन या भव्य कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे.

हिंद की चादर कार्यक्रमाने गुरु तेग बहादूर जी यांच्या विचारांनी भाविकांना नवसंजीवनी मिळणार आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देखील या कार्यक्रमातून जनतेला मिळणार आहे. विविध समाजघटकांचा सहभाग आणि महाराष्ट्र शासनाचे सक्रिय सहकार्या मुळे हा भव्य उपक्रम भाविकांसाठी ऐतिहासिक आणि प्रेरणादायी पर्व ठरणार आहे. गुरु तेग बहादूर जी यांनी दिलेला संदेश आजही तितकाच समर्पक आहे – सर्व धर्मांचा सन्मान करा, अन्यायाविरुद्ध उभे रहा आणि मानवतेचे रक्षण करा.

या भव्य ऐतिहासिक कार्यक्रमात मोठ्या संख्येन सहभागी व्हा!

– **अरुण सुर्यवंशी**, जिल्हा माहिती अधिकारी, जालना

# पानिपतचे तिसरे युद्ध : मराठा साम्राज्याच्या इतिहासातील रक्तरंजित पण तेजस्वी पर्व

भारतीय इतिहासातील काही लढाया केवळ रणांगणापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या संपूर्ण राष्ट्राच्या भवितव्याला कलाटणी देतात. पानिपतचे तिसरे युद्ध ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १४ जानेवारी १७६१ रोजी, मकर संक्रांतीच्या दिवशी हरियाणातील पानिपतच्या रणभूमीवर लढले गेलेले हे युद्ध मराठा साम्राज्याच्या इतिहासातील सर्वात भीषण, वेदनादायी आणि निर्णायक संघर्ष मानले जाते. हे युद्ध केवळ सत्तेसाठी नव्हते, तर हिंदुस्तानला परकीय आक्रमणापासून वाचविण्यासाठी मराठ्यांनी दिलेला तो अंतिम झंझावात होता.

अठराव्या शतकाच्या मध्यावर मराठा साम्राज्य आपल्या सामर्थ्याच्या सर्वोच्च टप्प्यावर होते. दक्षिणेतून निघालेली मराठ्यांची पताका उत्तरेत अटकेपार फडकत होती. दिल्लीवर मराठ्यांचा प्रभाव वाढत चालला होता आणि हीच गोष्ट अफगाणिस्तानातील दुर्राणी साम्राज्याचा संस्थापक अहमद शाह अब्दाली याला अस्वस्थ करणारी ठरली. पंजाबमधील मराठ्यांची वाढती सत्ता मोडून काढण्यासाठी अब्दालीने भारतावर स्वारी केली. त्याने नजीब-उद-दौला,




शुजा-उद-दौला यांसारख्या मराठेविरोधी शक्तींना आपल्या बाजूने वळवले आणि मराठ्यांविरुद्ध मोठी आघाडी उघडली.

या मोहिमेचे नेतृत्व पेशव्यांचे चुलतबंधू सदाशिवराव भाऊ आणि पेशव्यांचे सुपुत्र विश्वासराव यांच्याकडे होते. मराठा सैन्य उत्तरेत पोहोचले असले तरी त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होती. शत्रूंनी रसद मार्ग तोडल्यामुळे अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता. सैनिक उपाशीपोटी होते, थंडी कडाक्याची होती आणि तरीही माघार न घेता उपासमारीने नव्हे, तर रणांगणावर मरण पत्करायचे असा निर्धार करून मराठ्यांनी युद्ध स्वीकारले.

१४ जानेवारी १७६१ रोजी सकाळी युद्धाला सुरुवात झाली. सुरुवातीच्या टप्प्यात इब्राहिम खान गारदी यांच्या तोफखान्याने अब्दालीच्या सैन्यावर जबर मारा केला आणि काही काळ मराठ्यांचे पारडे जड वाटू लागले. मात्र दुपारच्या सुमारास युद्धाने निर्णायक वळण घेतले. पेशव्यांचे सुपुत्र विश्वासराव यांना गोळी लागून ते रणांगणावर कोसळले. हा प्रसंग पाहताच सदाशिवराव भाऊ हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाले आणि शत्रूवर तुटून पडले. परंतु सेनापती हत्तीवर दिसत नसल्याने मराठा सैन्यात गोंधळ उडाला, मनोबल खचले आणि शिस्त ढासळली.

याच संधीचा फायदा घेत अहमद शाह अब्दालीने आपल्या राखीव सैन्याला युद्धात उतरवले. उंटांवर बसवलेल्या तोफांमधून झालेल्या माऱ्याने आधीच थकलेल्या मराठा सैन्यावर भीषण हल्ला झाला. सायंकाळपर्यंत रणांगणावर मृतदेहांचे ढीग पडले आणि मराठ्यांचा पराभव निश्चित झाला. या युद्धात सदाशिवराव भाऊ, विश्वासराव, इब्राहिम खान गारदी, जनकोजी शिंदे, शमशेर बहाद्दर यांसारखे अनेक पराक्रमी योद्धे वीरमरण पावले. अंदाजे एक लाख मराठा सैनिक आणि तितकेच निरपराध नागरिक या संघर्षात मारले गेले.

या भयंकर हानीची बातमी पुण्याला एका सांकेतिक संदेशातून कळवण्यात आली–दोन मोती गळाले, सत्तावीस मोहरा हरपल्या आणि तांबे नाण्यांची तर गणतीच नाही. या ओळी पानिपतच्या भीषणतेचे जिवंत चित्र उभे करतात. या पराभवाचा आघात सहन न होऊन काही महिन्यांतच नानासाहेब पेशव्यांचे निधन झाले. मराठ्यांची उत्तरेतील पकड तात्पुरती सैल झाली, जरी काही वर्षांत त्यांनी पुन्हा उभारी घेतली तरी या धक्क्याचे परिणाम दीर्घकाळ जाणवत राहिले.

अब्दाली जरी युद्ध जिंकला, तरी त्यालाही प्रचंड नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे दिल्लीवर दीर्घकाळ राज्य न करता तो परत गेला. मात्र मराठ्यांच्या दुर्बलतेचा फायदा पुढे इंग्रजांनी घेतला आणि भारतात आपली सत्ता मजबूत करण्याचा मार्ग त्यांना खुला झाला.

तरीही पानिपतचे तिसरे युद्ध हे केवळ पराभवाचे प्रतीक नाही. ते मराठ्यांच्या शौर्याचे, बलिदानाचे आणि राष्ट्ररक्षणाच्या निष्ठेचे अमर स्मारक आहे. परकीय आक्रमकांविरुद्ध लढताना मराठ्यांनी आपल्या रक्ताचे पाणी केले. म्हणूनच आजही मराठीत पानिपत होणे हा वाक्प्रचार मोठ्या नुकसानाच्या अर्थाने वापरला जातो. इतिहासाने मराठ्यांना त्या दिवशी हरवले असले, तरी त्यांच्या पराक्रमाची, स्वाभिमानाची आणि बलिदानाची आठवण कधीही पुसली जाणार नाही–हाच पानिपतचा खरा अर्थ आहे.

– **गणेश मच्छिंद्र सपकाळ**, दैनिक आत्ताच एक्सप्रेस, जालना जिल्हा प्रतिनिधी, मो नंबर. ९५०३६१५७५७

## संक्षिप्त

# उपाध्याय विरजन सागर महाराज यांचे यांचे नमोकार तीर्थाकडे विहार



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** देशमुख नगर येथील ऐतिहासिक चातुर्मास व सात दिवस योग साधना शिवीराची सांगता झाल्यानंतर उपाध्याय वीरजनसागर महाराज यांचे देशमुख नगर छावणी मार्गाने छत्रपती नाशिक हायवेवरील मनोज फुलचंद दगडा याचा फार्महाऊसवर उपाध्याय सघाचे यांचे आगमन झाले सर्वप्रथम भगवंतांच्या पंचामृत अभिषेक करण्यात आला तर नंतर शांती मंत्राचे वाचन उपाध्याय विरजन सागर महाराज यांनी केले तसेच यांची यावेळी आहारचर्या संपन्न झाली व विशेष प्रवचन संपन्न झाले यावेळेस फुलचंद मनोज रेखा रितू उमंग तरंग दगडा परिवारा उपाध्याय विरजनसागर महाराज याचे पादपुजा केले यावेळी गुरुदेव यानी सागितलं की ,धर्म प्रभावना बरोबरच आत्मकल्याण मोक्ष कल्याण हेच ध्येय असल्याचे सांगितले. संघ,स्वाध्याय, साधना आणि समाधी हाच आपला मूलधर्म आहे असे उपस्थितीना प्रवचन देताना बोलले. यावेळेस महिलांनी डोक्यावर कलश घेऊन जयघोश करत भव्य मिरवणुकीने स्वागत केले. तसेच यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात आला नमोकार तीर्थ येथे आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवात उपस्थित राहण्यासाठी उपाध्याय विरजन सागर महाराजांचे विहार झाले आहे यावेळी सावन चुडीवाल सोनु दगडा नरेंद्र अजमेरा सपना चूडीवाल आशा चूडीवाल निकीता चुडीवाल अमीत गगवाल निरज बडजाते जयेश बडजाते चंद्रप्रकाश मत्री नंदु अनर्थ जितेंद्र गगवाल सोमनाथ सोमासे नदु पाटील आदीं उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

# केजमध्ये मकर संक्रांतीचा उत्साह; 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला!

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज / प्रतिनिधी/** थंडीच्या कडाक्यातही केज शहरासह परिसरात मकर संक्रांतीचा सण आज अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला म्हणत एकमेकांना शुभेच्छा देत नागरिकांनी स्नेहाचा संदेश दिला. शहरात सकाळपासूनच मंदिरांमध्ये भाविकांची मांदियाळी आणि गच्चीवर पतंगांची रंगत पाहायला मिळाली.



बाजारपेठेत खरेदीची लगबग अन् सुवासिनींचे पूजन

सणानिमित्त मागील दोन दिवसांपासून केजच्या मंगळवार पेठ आणि कानडी रोड भागात मोठी गर्दी होती. सुगड, ऊस, बोरं, गाजर आणि तिळाच्या खरेदीसाठी बाजारपेठ फुलून गेली होती. आज सकाळी सुवासिनींनी पारंपरिक पद्धतीने सुगडांचे पूजन केले. दुपारी ३ वाजेपासून पूजेचा मुहूर्त असल्याने शहरातील विविध मंदिरांत महिलांची वाण देण्यासाठी आणि हळदी-कुंकवासाठी मोठी लगबग दिसून आली.

**आकाशात पतंगांची झुंज; नायलॉन मांजाला फाटा :** तरुणाईमध्ये पतंगबाजीचा जबरदस्त उत्साह पाहायला मिळाला. शहराच्या विविध भागांतील गच्चीवरून काट रे काट च्या घोषणा ऐकू येत होत्या. विशेष कौतुकास्पद बाब म्हणजे, प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत केजच्या नागरिकांनी 'नायलॉन मांजा' वापरणे टाळल्याचे चित्र दिसले.

**मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल :** शहरातील प्रमुख मंदिरांमध्ये आज विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते: शिक्षक कॉलनी: हनुमान मंदिर, गणपती मंदिर, राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिर. इतर देवस्थाने: शुक्रवार पेठेतील बालाजी मंदिर, देशपांडे गल्लीतील समर्थ मठ, वकीलवाडीतील हनुमान मंदिर. या सर्व ठिकाणी विशेष पूजा-अर्चा करण्यात आली. संक्रांतीच्या मुहूर्तावर दानधर्माला महत्त्व असल्याने अनेकांनी गरजूंना मदत केली. सूर्यदेवाला तिळाचे लाडू आणि गुळाच्या पोळीचा नैवेद्य दाखवून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# विद्रोही कवी,लेखक र.वि.माळापुडेकर यांना साहित्यिक भंन्ते नागरत्नजी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** कळवा (ठाणे) येथील विद्रोही कवी,लेखक र.वि.माळापुडेकर यांना हुपरी (जि.कोल्हापूर) येथील युवा बौद्ध धम्म परिषदेचा साहित्यिक भंन्ते नागरत्नजी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला.पुरस्कार वितरण १८ जानेवारीला हुपरी येथे आहे.

बौद्धाचार्य र.वि.माळापुडेकर हे भीमनगर (माळापुडे,ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) येथील मूळचे रहिवाशी असून सध्या ठाणे येथे वास्तव्यास आहेत.गेली वीस वर्षे धम्म चळवळीत बुद्ध,शिव,शाहू,फुले,आंबेडकरी विचारधारेतून विद्रोही कविता,कथा,स्तंभ लेखनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व धम्म प्रचार प्रसार कार्यात अग्रेसर आहेत. त्यांच्या लेखनामुळे समाज प्रबोधन व धम्म प्रचार प्रसारास मोलाचे योगदान मिळत आहे. साहित्य सेवेतील त्यांच्या उल्लेखनीय व भरीव योगदानाबद्दल युवा बौध्द धम्म परिषद महाराष्ट्र व कर्नाटक राज्य यांच्यावतीने त्यांना साहित्यिक भंन्ते नागरत्नजी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.या निवडीबद्दल मुंबई व कोल्हापूर जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार वितरण १८ जानेवारीला हुपरी (ता. हातकणंगले,जि.कोल्हापूर) येथे होणार आहे.

# हुंड्यासाठी छळ आणि विवाहितेची आत्महत्या; वानेगाव येथील घटनेत सासरच्या ६ जणांवर गुन्हा

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** जेसीबी खरेदी करण्यासाठी माहेरहून २ लाख रुपये घेऊन ये, या मागणीसाठी सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून वानेगाव येथील ३१ वर्षीय विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. सुनीता आण्णा भोकरे असे मृत महिलेचे नाव असून, याप्रकरणी फुलंब्री पोलीस ठाण्यात सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

सुनीता यांचा विवाह १२ वर्षांपूर्वी वानेगाव येथील आण्णा भोकरे यांच्याशी झाला होता. मंगळवारी (दि. १३) घरातील सर्व सदस्य एका नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी गेले असताना, दुपारी ३ वाजेच्या सुमारास सुनीता घरातून बेपत्ता झाल्या. बराच वेळ शोध घेऊनही त्या न सापडल्याने अखेर घराजवळील विहिरीत शोध घेण्यात आला. रात्रभर विद्युत पंपाने पाणी उपसा केल्यानंतर बुधवारी सकाळी सुनीता यांचा मृतदेह विहिरीत आढळून आला.

नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

मृतदेह शवविच्छेदनासाठी फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला, मात्र सुनीता यांचा छळ करून त्यांचा खून करण्यात आल्याचा आरोप माहेरच्या नातेवाईकांनी केला.

दोषींना तात्काळ अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेत नातेवाईकांनी मृतदेह थेट फुलंब्री पोलीस ठाण्यासमोर आणून ठेवला.

बुधवारी रात्री उशिरापर्यंत नातेवाईकांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

**ई - निविदा सुचना क्रमांक (३१) २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना (दुरध्वनी क्रमांक - ०२४८२ - २०३०१४३) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडुन जालना जिल्हयातील (०४) कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) व्दारे मागविण्यात येत आहे.

टिप:-.... १) निविदा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग https://pwd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२) सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सत्यमेव जयते

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जालना**

# प्रा. बाबासाहेब माने यांना ६६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ मराठी पदवी प्रदान



**आत्ताच एक्सप्रेस**

**धारूर / प्रतिनिधी/** तालुक्यातील आंबेवडगाव येथील प्राध्यापक बाबासाहेब माने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ६६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ पार पडला प्राध्यापक डॉ. सुनील भागवत भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आय. आय. एस. इ. आर )प्रा. डॉ. विजय फुलारी( कुलगुरू) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्रा. डॉ. वाल्मीक सरवदे प्र कुलगुरू. प्रा बाबासाहेब डोळे प्रा. प्रशांत अमृतकर (कुलसचिव ) यांच्या हस्ते पी एच डी पदवी प्रदान करण्यात आली प्रा. बाबासाहेब माने यांनीनव्दनंतरच्या बदलत्या राजकारणाच्या संदर्भात विजय जावळे यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास'' या विषयावर प्रबंध डॉ प्राचार्य शिवदास झेड शिरसाठ यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाला सादर केला दरम्यान प्रा. बाबासाहेब माने यांनी उत्तीर्ण केलेले आहे एम. ए, बी.एड,एम फिल. उत्तीर्ण केलेले आहे या यशाबद्दल प्रा. माने यांचे विभाग प्रमुख प्राचार्य शिवदास शिरसाठ, उपप्रचार्य प्रा..शिंदे सर, प्रा. दिलीप भिसे सर, प्रा. राजपंखे, प्रा. घोडके सर,प्रा. भरती सर, प्रा. लोखंडे सर प्रा. सुरेवाड, प्रा. हंडीबाग सर सर्व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सर्व कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले.



# शेतकरी कृती समितीच्या तक्रारीची दखल कार्यवाहीचे कार्यकारी अभियंत्यांचे आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी.फिरोज मन्सुरी/** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील महावितरण कार्यालयाला वाली कोण आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला दरम्यान महावितरण अभियंता व गंगापूर मतदारसंघाचे आ प्रशांत बंब यांना ईमेल द्वारे निवेदन दिले होते.त्या निवेदनाची दखल घेत आ प्रशांत बंब यांनी दि.१०/०१/२०२६ कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी ग्रामीण २ विभाग छत्रपती संभाजीनगर यांना लासुर स्टेशन महावितरण कार्यालयातील रिक्त पदे व सेवा समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत. पत्र दिले होते त्यानुसार गायकवाड डिपी पाडळसा व शेरी डिपी पिंपळगाव तात्काळ बसवण्यात आली. लासुर स्टेशन महावितरण कार्यालयात गेल्या दोन महिन्यांपासून कायमस्वरूपी सहाय्यक अभियंता नसल्याने पदभार वाळुज कार्यालयाकडे सोपविण्यात आला आहे. या कारणामुळे शेतकरी व नागरीकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण होत आहे.

**सध्याच्या प्रमुख समस्या:** अनेक गावांमध्ये वायरमन उपलब्ध नाहीत; जिथे आहेत तिथे अनेक गावांची जबाबदारी दिल्याने वेळेवर सेवा मिळत नाही. धोकादायक पोल, उ्झ व तारांची कामे प्रलंबित राहिल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. दर आठवड्यातील दुरुस्ती कामे वेळेत होत नाहीत. दिवसा फक्त ४ तास वीजपुरवठा होत असल्याने रोहीत्रीवर दबाव वाढून पुरवठा खंडित होतो. जबाबदार अभियंता नसल्याने तक्रारींचे निवारण होत नाही व नागरिकांना स्वतः दुरुस्ती करावी लागते. त्यानुषंगाने, १) लासुर स्टेशन अंतर्गत प्रत्येक गावात कायमस्वरूपी



वायरमन नेमून त्यांची यादी व मोबाईल क्रमांक सार्वजनिक करावेत. २) दिवसा ४ तासाऐवजी किमान ८ तास वीजपुरवठा करण्यात यावा. ३) आठवड्यातून एक दिवस दुरुस्तीची कामे नियमित करण्यात यावीत व त्याचा आढावा उपकार्यकारी अभियंता गंगापूर यांनी घ्यावा. ४) लासुर स्टेशन महावितरण कार्यालयात कायमस्वरूपी सहाय्यक अभियंता नेमणूक करण्यात यावी. ५) ६५ क्झ चे ३ व १०० क्झ चे २ रोहीत्री, फ्युज सेट व लागणारे साहित्य कायमस्वरूपी उपलब्ध ठेवण्यात यावे. ६) लिखित तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात यावा व त्याचा आढावा वेळोवेळी घ्यावा. वरील मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा शेतकरी व नागरीकांनाकडून रोषाला सामोरे जावे लागेल याची गंभीर नोंद घ्यावी असे पत्र आमदार प्रशांत बंब यांनी दिले आहे.यासाठी शेतकरी व नागरीकांच्या वतीने इंजी.महेश गुजर यांनी आभार मानले आहे.

# भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाची गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी जाहीर



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर येथे भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाची गंगापूर तालुकास्तरीय पत्रकारांची महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली (दि. १४ जाने) बुधवार रोजी पंचायत समिती सभागृहात बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय बन्सोड होते. यावेळी प्रदेश सचिव अयुब पटेल, मराठवाडा अध्यक्ष अलिम चाऊस, जिल्हाध्यक्ष शिवप्रसाद बन्सोड तसेच जिल्हा सचिव इब्राहिम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान

या बैठकीत सन २०२६ साठी गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये बाळासाहेब वाघमारे यांची तालुकाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली, तर लक्ष्मीकांत माघाडे

**तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब वाघमारे उपाध्यक्षपदी फिरोज मन्सुरी तर कार्याध्यक्षपदी गुलाब वाघ यांची निवड...**

यांची तालुका सचिवपदी निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना प्रदेशाध्यक्ष विजय बन्सोड व प्रदेश सचिव अयुब पटेल यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांच्या समस्या प्रभावीपणे सोडवणे, संघटनेची ताकद वाढवणे तसेच पत्रकारितेतील मूल्ये आणि व्यावसायिक आचारसंहिता जपण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे :अध्यक्ष : बाळासाहेब वाघमारे, उपाध्यक्ष : फिरोज मन्सुरी,गिरीष गंगापूरकर, बापू सोमासे सचिव : लक्ष्मीकांत माघाडे, सहसचिव : सदाशिव जंगम, चंद्रकांत जाधव, कार्याध्यक्ष : गुलाब वाघ,सहकार्याध्यक्ष : अमर बाशवान,प्रसिद्धी प्रमुख : विशाल जोशी, संघटक : सुनील झिंजुर्डे,सहसंघटक : गणेश म्हैसमाळे, सदस्य : धनंजय ठोंबरे, अमोल पारखे, गणेश साळुंके, अमोल आळंजकर, गोपाल बन्सोड आदींचा समावेश आहे.या नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावीपणे राबवले जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीस भारतीय बौद्धिक पत्रकार संघाचे अधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ ४ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांना उपस्थिती नोंदणी करणेचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक / प्रतिनिधी/** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत (पदवीप्रदान) समारंभ बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठ मुख्यालयात आयोजित करण्यात आला आहे. त्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी येत्या दिनांक २० जानेवारीपर्यंत आपल्या उपस्थितीची ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार हा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. त्यात सन २०२४-२०२५ या वर्षात (डिसेंबर २०२४, मार्च २०२५ व मे/जून २०२५ ह्या परीक्षांमध्ये) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. त्यास प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://31convocation.ycmou.ac.in/attendance या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपया ऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिक ही दिनांक १४/०१/२०२६ ते दिनांक २०/०१/२०२६ या कालावधीत सुरू राहील व या कालावधीतच नोंदणी करता येईल. यास मुदतवाढ मिळणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल. तसेच दीक्षांत समारंभच्या दिवशी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेत विद्यापीठ मुख्यालयात हजर राहून व अनामत रक्कम रु. ५००/- (पाचशे रुपये) भरून विद्यार्थ्यांना दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने आधी देखील भरता येईल.

अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणेबाबत तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती समारंभापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 या लिंकवर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल. ती विद्यार्थ्यांनी पहावी. पीएच. डी. पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहीत धरण्यात आलेली आहे. त्यांनी स्वत:च्या उपस्थितीची नोंद करू नये. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या उपस्थिती बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे, त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. ज्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील. त्यासाठी त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता दीक्षांत समारंभात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दोन दिवसीय दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा दिनांक १६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) व १७ जानेवारी (शनिवार) रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रवास आहे. १६ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील 'युवा संमेलनात' त्यांची उपस्थिती राहील. या संमेलनात आपली संस्कृती, राष्ट्रीय स्वावलंबन आणि इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचारांची देवाण- घेवाण होणार आहे. हा कार्यक्रम चखढ कॉलेजच्या मागील बाजूस मंथन सभागृहात विशेष आमंत्रितांसाठी सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत असेल. तर त्याच दिवशी सायंकाळी गंगापूर येथे हिंदू संमेलनात ते समाजाला उद्बोधन करतील. या संमेलनात हिंदू समाजातील प्रत्येक घटकाने संघटित होऊन धर्मजागृतीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजप्रबोधन, संस्कृती रक्षण व राष्ट्रभक्तीचा संदेश देणारे विचार या संमेलनातून मांडले जाणार आहेत. हा कार्यक्रम गंगापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर पूजनीय संतांच्या उपस्थितीत सायंकाळी ५.०० वाजता सुरु होईल. दिनांक १७ जानेवारी रोजी पू. सरसंघचालक छत्रपती संभाजीनगर शहरात संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त (१९२५-२०२५) समाज जीवनातील प्रभावशाली व्यक्तींशी विचारांचे, कर्तृत्वाचे व अनुभवांचे थेट संवाद साधण्याच्या उद्देशाने विशेष आमंत्रितांसाठी 'युवा उद्यमी संवाद' कार्यक्रमास उपस्थित राहतील. हा कार्यक्रम समर्पण कार्यालय, चखढ कॉलेज जवळ सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत होईल. तसेच सायंकाळी ४.०० वाजता विशेष आमंत्रित व्यक्तींसोबत प्रमुख जन संगोष्ठी मध्ये संवाद साधतील. यामध्ये समाजाचे दिशादर्शक, सन्माननीय व्यक्तित्व उपस्थित असतील. त्यांच्यासोबत पू. सरसंघचालक संवाद व चर्चा करतील.

# जालना शहर महानगरपालिकेच्या नगरसेवकाच्या सार्वत्रिक निवडणुकाचे शांततेत मतदान







जालना शहर महानगरपालिकेच्या नगरसेवकाच्या सार्वत्रिक निवडणुका चे मतदानावेळी सर्व ठिकाणी शांतता दिसून आली. मतदानासाठी लागलेल्या रांगा

(छायाचित्र: किरण खानापुरे)




## संक्षिप्त

### जालन्यात वंचित बहुजन आघाडीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ३२ व्या नामविस्तार दिनानिमित्त जालना शहरातील वंचित बहुजन आघाडीच्या विभागीय जनसंपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अंबड चौफुली येथील कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात नामविस्तार लढ्यातील शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दीपक डोके यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करण्यात आले.यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी नामविस्ताराच्या लढ्यात बलिदान दिलेल्या शहीद भीम सैनिकांच्या स्मृतींना उजाळा दिला. १७ वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर मिळालेला हा विजय सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ऐतिहासिक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. ३२ व्या नामविस्तार दिनानिमित्त कार्यकर्त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा विजय असो' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने:

राजेंद्र खरात (जिल्हा संघटक),रमाताई होर्शिळ (महिला जिल्हाध्यक्षा),सूरज सोनोवणे (सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष),संजय आदमाने राज आदमाने (कामगार आघाडी शहराध्यक्ष),विलास नरवडे (तालुका उपाध्यक्ष) यांच्यासह सत्यपाल गायकवाड, मैनाताई खंडागळे, मायाताई वानखेडे, दिलीप मगर, गौतम पाडमुख, राजू अचलखांब, सुरेश आदमाने आणि इतर अनेक कार्यकर्ते व भीमसैनिक उपस्थित होते.

### जि. प. शाळा बाचेगाव येथे 'मी ज्ञानी होणार' उपक्रमातील गुणवंतांचा गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**

**बाचेगाव/प्रतिनिधी/** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाचेगाव येथे राज्यस्तरीय 'मी ज्ञानी होणार' या उपक्रमांतर्गत परीक्षेत सुयश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव सोहळा उत्साहात पार पडला.या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. पांडुरंग मुळे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची ओढ निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रमुख यश संपादन केलेले विद्यार्थी: या परीक्षेत इयत्ता ६ वीचा विद्यार्थी समर्थ विष्णू मुळे याने १०० पैकी १०० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या या दैदिप्यमान यशाबद्दल प्राथमिक शिक्षक गिरे सर यांच्या वतीने त्यास १०१/- रुपये रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

## जालन्यात मतदानाच्या दिवशीच कुत्र्याचा थरार; १५ जण रक्ताळले, महापालिका झोपलीये का?

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी घराबाहेर पडलेल्या निष्पाप मतदारांवर काळानं घाला घातला नाही, तर प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे एका पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः रक्ताचा सडा टाकला. जालना शहरातील सरस्वती भुवन, शनी मंदिर आणि काली मशीद परिसरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घालत १५ जणांना गंभीर जखमी केले आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात दहशतीचे वातावरण असून, मतदान करायला जायचे की कुत्र्यांच्या दाढेत मरायचे? असा संतापजनक सवाल नागरिक विचारत आहेत.



**भरदिवसा तांडव: कोणाचे लोचके तोडले, तर कोणाचे बोट छाटले!**

आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास, जेव्हा मतदानाची लगबग सुरू होती, तेव्हा अचानक एका पिसाळलेल्या कुत्र्याने नागरिकांवर हल्ले चढवण्यास सुरुवात केली. हे हल्ले इतके भीषण होते की, कुत्र्याने काहींच्या पायाचे अक्षरशः लोचके तोडले, तर एका दुर्दैवी नागरिकाच्या हाताची करंगळीच तोडून टाकली. लहान मुले, महिला आणि वृद्ध कोणीही या रानटी हल्ल्यातून सुटले नाही.

**जिल्हा रुग्णालयात रक्ताळलेल्या जखमींची रांग**

या हल्ल्यानंतर जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींची नावे खालीलप्रमाणे आहेत:

शिवराज वेव्हारे, शेख मोबीन, तारेख सुबानी, पूर्वेस सुपारकर, नासेर चाऊस, राजश्री कसबे, शेख रीहान, सैय्यद सलादीन, अमिनोदिन शेख, मोहसिन कुरेशी, आसिफ कुरेशी, संगीता साळवे, स्नेहा येमुल आणि शेख अतिक,डॉ. आशिष देवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एकूण १५ जणांवर उपचार सुरू असून यापैकी दोन जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. रुग्णालयात जखमींच्या नातेवाईकांनी एकच गर्दी केली असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

**प्रशासनाचे 'मरण' की 'झोप'?**

एकीकडे मतदानासाठी प्रशासनाकडून जनजागृती केली जाते, मात्र दुसरीकडे मतदारांच्या सुरक्षेचे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील रस्त्यांवर पिसाळलेली कुत्री फिरत असताना महापालिका प्रशासन काय करत होते? या घटनेला सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.नागरिकांचा संतप्त सवाल: आम्ही मतदान कोणासाठी करायचे? जर आमचा जीवच सुरक्षित नसेल, तर या प्रशासनाचा उपयोग काय? त्या पिसाळलेल्या कुत्र्याला तात्काळ ठार करा किंवा पकडा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू!

**आता तरी जाग येईल का?**

या घटनेने जालना शहरात कुत्र्यांची प्रचंड दहशत पसरली आहे. नागरिक घराबाहेर पडायला घाबरत आहेत. महापालिकेने या पिसाळलेल्या कुत्र्याचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि जखमींना योग्य भरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. जर यावर त्वरित कारवाई झाली नाही, तर या संतापाचा उद्रेक मतपेटीतून किंवा रस्त्यावर उतरून झाल्याशिवाय राहणार नाही.

## तडीपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमावर गोंदी पोलिसांचा कडक कारवाईचा बडगा



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** मा.पोलीस अधीक्षक जालना यांनी आदेश जा.क्र. स्थागुशा/मपोका क्र. ५५/२०२५-२८४८ जालना दि.१०/११/२०२५ अन्वये पोलीस ठाणे गोंदी हद्दीतील एकूण ११ इसमावर महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५५ (१) अन्वये हद्दपारीचा प्रस्ताव मंजूर करून त्यांना एका वर्षासाठी जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेले आहे.तरी दि १३/०१/२०२६ रोजी ११.३० वाजेच्या सुमारास पोलीस ठाणे गोंदी प्रभारी अधिकारी सपोनि आशिष खांडेकर सोबत,पोउपनि हावले,पो का दिपक भोजने,शेख असे गोंदी गावात असताना हद्दपार इसम नामे गणेश कैलास मरकड वय २६ वर्ष रा गोंदी ता अंबड जि जालना,हा गोंदी गावामध्ये त्याचे ताब्यात विना क्रमांकाचे लाल रंगाचे स्वराज ७४४ दढ कंपनीचा ट्रॅक्टर व त्याची ट्रॉली जोडलेली हा घेऊन भाग्यनगर च्या दिशेने जाताना दिसला.त्यास थांबवण्यासाठी हात केला असता त्याने त्याचे ताब्यातील स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली ही घेऊन भरधाव वेगात भाग्यनगरकडे सार्वजनिक ठिकाणी ट्रॅक्टर पळवला व पोलीस पथकाने त्याचा पाठला केला. असता त्यांनी त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर हे भाग्यनगर येथे सोडून उसाच्या शेतीमध्ये पळून गेला सदरचे ट्रॅक्टर व ट्रॉली हे जप्त करण्यात आलेली असून हद्दपार आरोपी नामे गणेश कैलास मरकड वय २६ वर्ष राहणार गोंदी. ता.अंबड जि. जालना यास मा पोलीस अधीक्षक जालना यांनी कलम ५५ (१) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९९१ अन्वये आदेशाची उल्लंघन केले.म्हणून त्याच्यावर पोलीस ठाणे गोंदी येथे गुरंन १०/२०२६ कलम २८१ भा न्या स व सह कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९९१ अनन्वय गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे सदरची कार्यवाही सपोनी आशिष खांडेकर व त्यांच्या पथकाने केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि एस एम मुपडे हे करीत आहेत.तसेच इतर हद्दपार व तडीपार इसमाच्या हालचालीवर देखील लक्ष ठेवून असल्याचे प्रभारी अधिकारी सपोनि आशिष खांडेकर यांनी सांगितले आहे.

## सार्वजनिक ग्रंथालयांनी 'ई-ग्रंथालय' व '-ख' चा वापर करून अद्ययावत व्हावे : सुनील हुसे

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (जालना)/ प्रतिनिधी/** शासनाने ई-ग्रंथालय प्रणालीचा वापर करून कामाला गती दिली आहे. ही प्रणाली अत्यंत सोपी असून, बदलत्या काळानुसार सार्वजनिक ग्रंथालयांनी आधुनिक साधनांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सुनील हुसे यांनी केले.

जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनच्या २८ व्या एक दिवसीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन बदनापूर येथे पार पडले, त्याप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. स्वामी विवेकानंद वाचनालय (बदनापूर) आणि ग्रंथालय भारती (शाखा जालना) यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी २०२६ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**ग्रंथालयांचे डिजिटल रूपांतर आणि 'एआय'चा वापर :** सुनील हुसे यांनी आपल्या भाषणात तंत्रज्ञानावर भर दिला. ते म्हणाले की, ई-ग्रंथालय प्रणालीमुळे वाचकांना हवा असलेला ग्रंथ शोधणे सोपे झाले आहे. ग्रंथालयांनी केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता व्हॉट्सप, फेसबुक यांसारख्या सोशल मीडियाचा वापर करून वाचकांचे गट तयार करावेत. तसेच, भविष्यात ए.आय. (-rtificial Intelligence) चा वापर करून वाचकांना प्रगत सेवा देण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून ग्रंथालये खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' होतील.

**ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न :** अध्यक्षीय भाषणात ग्रंथालय भारतीचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. राजशेखर बालेकर यांनी डिजिटल क्रांतीचे स्वागत केले, मात्र ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या समस्यांकडेही लक्ष वेधले. ते म्हणाले, ग्रंथालयांचे डिजिटल रूपांतर करताना शासनाने कर्मचाऱ्यांच्या तुटपुंज्या वेतनाचा विचार करणे गरजेचे आहे. २०१२ पासून नवीन मान्यता, वर्ग बदल आणि अनुदान वाढीचे प्रश्न प्रलंबित आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली ४० टक्के अनुदान वाढ याच आर्थिक वर्षात मिळावी, यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तसेच, महाराष्ट्रात स्वतंत्र 'राज्य ग्रंथालय धोरण' तयार व्हावे, अशी मागणीही त्यांनी केली.

**पुरस्कारांचे वितरण :** या अधिवेशनात ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला:

शंकरराव बालेकर स्मृती उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार: गणेश वाचनालय (वालसावंगी, ता. भोकरदन). भगवानराव देशपांडे स्मृती उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार: राजाराम अण्णासाहेब चव्हाण (मरणोत्तर), शिवशक्ती वाचनालय (पांगरी गोसावी, ता. मंठा). अण्णासाहेब तातेराव चव्हाण स्मृती उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी पुरस्कार: शाम शेलगावकर (ग्रंथपाल, श्रीराम वाचनालय, जालना).

याव्यतिरिक्त, प्रविण देशपांडे लिखित डॉ. राजशेखर बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**उपस्थित मान्यवर :** कार्यक्रमाला निवृत्त सहायक ग्रंथालय संचालक सु. बा. जैन, प्रकाशक परिषदेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे, विभागीय ग्रंथपाल संतोष जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर, गुलाबराव मगर, जीवन लोखंडे, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रमोद कुमावत, अनिल बाविस्कर, डी. बी. देशपांडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. बी. देशपांडे यांनी केले, सूत्रसंचालन देविदास जिगे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीकांत काळे यांनी केले. या अधिवेशनास जिल्ह्यातील ग्रंथपाल, कर्मचारी आणि ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813